साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

✻ परळी वैजनाथ ✻ सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## बीड-अहिल्यानगर रेल्वेचा बुधवारी शुभारंभ; बीडकरांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार

बीड (बातमीदार):- मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर बुधवारी (दि.१७) बीड-अहिल्यानगर रेल्वे सेवेला शुभारंभ होणार आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.

या रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी



यांच्या उपस्थितीत होणार आहे. राज्य सरकारने बीडकरांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाची ही भेट दिली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून बीडकर या घटनेची आतुरतेने वाट पहात आहेत. बीडहून अहिल्यानगरला जाण्यासाठी बुधवारपासून रेल्वे सेवा उपलब्ध होणार आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर रेल्वे धावणार असून याचा फायदा बीडसह परिसरातील लाखो नागरिकांना होणार आहे. यामुळे शेतकरी, उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांची सोय होणार असून बीड जिल्ह्याच्या विकासासाठी ही रेल्वे वरदान ठरणार आहे. दरम्यान, या रेल्वे सेवेला शुभारंभ होणार असल्याने जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी सुरू केली आहे. रेल्वेचे महाव्यवस्थापक दरम वीर मीना, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रविवारी बीडच्या नव्या रेल्वे स्थानकाला प्रत्यक्ष भेट देवून पुर्व तयारीची पाहणी केली. यावेळी टीसीएसटीचे मणिंद्रसिंग उप्पल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, मुख्य अभियंता बी.के.सिंह, उपमुख्यअभियंता डी.डी.लोळगे यांच्यासह विनीतकुमार, ज्ञानेंद्र सिंग, जितेंद्र सिंह, उपविभागीय अधिकारी कवीता जाधव यांच्यासह इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्य सरकारच्या मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा उत्सव आणि मा.पंतप्रधानांच्या संबोधित होणाऱ्या आरोग्य अभियान कार्यक्रमाचा भाग असणार आहे. ✻✻

## मंगलताई नाकाडे यांचे निधन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील शंकर पार्वतीनगर भागातील रहिवाशी मंगलताई रामलिंग नाकाडे (वय ६६) यांचे दीर्घ आजाराने रविवारी (दि.१४) रात्री अकराच्या सुमारास पुणे येथे उपचारादरम्यान निधन झाले.

सोमवारी (दि.१५) दुपारी आडीच वाजता परळी येथील लिंगायत समाजाच्या स्मशानभुमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मंगलताई नाकाडे यांनी दीर्घकाळ येथील लिट्ल फ्लॉवर स्कूल या शाळेत सहशिक्षिका सेवा केली होती. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

एस.बी.आय.बँकेचे सेवानिवृत्त शाखाधिकारी रामलिंग दगडुअप्पा नाकाडे यांच्या त्या पत्नी होत्या. ✻✻

## दै.मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी यांच्यावर छ.संभाजीनगर येथे अंत्यसंस्कार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथून प्रकाशित होणाऱ्या दैनिक मराठवाडा साथीचे संपादक सतीश मोहनलाल बियाणी यांच्यावर शोकाकुल वातावरणात छत्रपती संभाजीनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सतीश बियाणी (वय ५७) यांचे रूग्णालयात उपचारादरम्यान शुक्रवारी सायंकाळी चारच्या सुमारास निधन झाले होते. छत्रपती संभाजीनगर येथील सिडको भागातील स्मशानभूमीत सकाळी ११ च्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात



आले. यावेळी पत्रकार, विविध वर्तमानपत्राचे संपादक, व्यापारी, नातेवाईक यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सतीश बियाणी यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, दोन भाऊ असा परिवार आहे.

चार दशकांपेक्षा अधिक काळापासून दैनिक मराठवाडा साथी या वृत्तपत्राची मोठी सतीश बियाणी यांनी जबाबदारी सांभाळली आहे. या वर्तमानपत्राचे संपादक म्हणून सतिश बियाणी यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. परळी शहरातील अनेक पत्रकार घडवण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले. स्व. मोहनलालजी बियाणी यांनी सुरू केलेल्या दैनिक मराठवाडा साथीच्या भरभराटीमध्ये सतीश बियाणी यांचा मोलाचा वाटा होता. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी मराठवाडा साथीचे वटवृक्षात रूपांतर केले. धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यामध्ये ते सहभागी होत असत. मराठवाडा साथीच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरू होते. उपचार सुरू असतानाच संभाजीनगर येथील एका खाजगी दवाखान्यांत त्यांची प्राणज्योत मालवली. ✻✻✻

## बंजारा समाजाला ST प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी बीडला सोमवारी मोर्चा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी सोमवारी (ता.१५) बीड येथिल जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चात परळी तालुक्यातील हजारो समाजबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. परळी येथील जिजामाता उद्यानात शनिवारी (ता १३) सकाळी ११:०० वाजता तालुक्यातील बंजारा समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. बैठकीत बंजारा समाजाचा हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (st) प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी सोमवारी (ता१५) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.मोर्चाच्या नियोजनासाठी परळी तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा अरुण पवार, बाळासाहेब (पप्पू) चव्हाण,कॉ पांडुरंग राठोड, साहेबराव चव्हाण, वसंत राठोड, सरपंच विनायक राठोड, पत्रकार प्रकाश चव्हाण आदींनी मोर्चाची रुपरेषा मांडली. तसेच मोर्चा शांततेत व शिस्तीत निघावा यासाठी आपण प्रयत्न करावे, निघताणाच स्वतः जेवन व पाणी बॉटल सोबत घ्यावे, यावेळी माजी नगरसेवक प्रभाकर राठोड यांनी मोर्चासाठी लागणारे ५००० झेंडे स्वखर्चाने दिले. यावेळी डि एस राठोड, रामाजी जाधव, परसराम पवार, दिलीप राठोड, रमेश पवार आदींसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.✻

# कथा बालमनावर संस्काराची बिजे पेरतात-लक्ष्मण वाकडे

## न्यू हायस्कूल शाळेत 'दप्तरविना शाळा' उपक्रमांतर्गत कथा वाचनाचा कार्यक्रम

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी कथा हे उत्तम साधन आहे, कथा बालमनावर संस्काराची बिजे पेरतात असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षक व पत्रकार लक्ष्मण वाकडे यांनी केले.

येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल व नवीन प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.१३) 'दप्तरविना शाळा' उपक्रमांतर्गत श्री वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या कथेच्या कथा वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक के.व्ही.मोरे हे होते. व्यासपीठावर पोलिस उपनिरीक्षक श्री पांचाळ, शाळेच्या पर्यवेक्षिका सौ.छाया देशमुख, उमेश देशमुख, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे, अमोल कांबळे, राहूल ताटे आदी मान्यवर उपस्थित होते. तर यावेळी कानिफनाथ सोळंके, सौ.मस्के, वर्षाराणी हाके, प्राजक्ता काटकर, सौ.मलशेटवार, विनोद वाघमारे, श्री बोंबले,



श्री श्रीरामे, सचिन काळम, सौ.साकसमुद्रे, नागेंद्र जाधव, सौ.आघाव, श्री घोलप, श्री डिकले, श्री कुलकर्णी, श्री टेकाळे आदींसह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

श्री वाकडे म्हणाले, बदलत्या जीवनशैलीमुळे व विभक्त कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळींकडून बालमनावर होणारे संस्कार कमी होत चालले आहेत. लहानपणी, आजी, आजोबा नातवंडांना गोष्टी सांगायचे. या गोष्टी बालमनावर खोलपर्यंत रूजायच्या. त्यातून नातवांचे व्यक्तीमत्व घडण्यास मोठी मदत व्हायची, परंतु आपण आज या गोष्टींना मुकत चाललो आहोत, बालकथा जपल्या पाहिजे, मुलांना सांगितल्या पाहिजेत असेही ते म्हणाले. यावेळी श्री वाकडे यांनी 'एक होता ढम्या' या सात भागांच्या कथा पुस्तिकेतील ढम्या झाला मोठ्ठा या कथेचे वाचन केले. त्यास उपस्थित विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. प्रारंभी शाळेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून श्री वाकडे यांचा मुख्याध्यापक के.व्ही.मोरे, पर्यवेक्षिका छाया देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वागत केले. प्रास्ताविक अमोल कांबळे यांनी केले. श्री कांबळे यांनी श्री वाकडे यांच्या लेखन प्रवासावर मनोगत व्यक्त केले. यावेळी सौ.छाया देशमुख यांनी श्री वाकडे यांच्या साहित्यावर विचार मांडले. सुत्रसंचालन बाबासाहेब मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन राहूल ताटे यांनी केले.✻

## परळीतील रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या दूर करा-अ‍ॅड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (बातमीदार):- शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, या खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका सुरूच आहे. सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी आवाज उठवत बातमीद्वारे संबंधित नगरपालिका प्रशासनाकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर खड्डे बुजवण्याचे काम सुरू झाले; मात्र हे काम केवळ थातुर-मातुर पद्धतीने केल्याने परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने काही दिवसांतच खड्डे पूर्ववत दिसू लागले आहेत. याचा फटका थेट दुचाकीस्वारांना बसत असून, अनेक



लहानमोठे अपघात घडत आहेत. नागरिकांचा जीव धोक्यात घालून प्रशासन केवळ कागदोपत्री काम करत असल्याची भावना लोकांमध्ये व्यक्त होत आहे. दररोज रस्त्यावरून शाळकरी मुलं, कामगार, महिला व ज्येष्ठ नागरिक यांचा प्रवास होत असतो. मात्र खराब दर्जाच्या कामामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार केलेल्या विनंतीनंतरही ठोस पावले उचलली जात नसल्याने परळीकरांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नागरिकांची ठाम मागणी आहे की, रस्त्यांचे खड्डे तातडीने दर्जेदार पद्धतीने बुजवावेत, जबाबदार ठेकेदारांवर कारवाई व्हावी आणि शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करून सुरक्षित वाहतूक व्यवस्था करावी.*

## जि.प.पं.समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळीत महाविकास आघाडीची मोर्चे बांधणी



परळी वैजनाथ, (बातमीदार):- जिल्हा परिषद, पंचायत समिती संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण जाहीर करण्यात आल्याने काही दिवसावरच निवडणुका जाहीर होण्याची शक्यता समोर ठेऊन परळीच्या महाविकास आघाडी प्रमुख नेत्यांची प्राथमिक बैठक घेण्यात आली.

या बैठकीला काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. याबैठकीत जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक संदर्भात चर्चा विनिमय करण्यात आली लवकरच सर्व आघाडी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची निवडणुकी संदर्भात सविस्तर बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. संपन्न झालेल्या बैठकीत कम्युनिस्ट पक्षाचे काँ. पी.एस.घाडगे, पांडुरंग राठोड, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई तालुका अध्यक्ष प्रकाश मुंडे, विधानसभा अध्यक्ष रणजित देशमुख, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बाबा शिंदे, उत्तम माने,एच. यु.फड, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख भोजराज पालीवाल, विधानसभा प्रमुख वैजनाथ साळुंखे, आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**बचत विजेची**
**समृद्धी राष्ट्राची !**

## तुकाराम मुंडे यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार जाहीर

परळी (बातमीदार):- तालुक्यातील वानटाकळी येथील उत्कृष्ट शेतकरी तथा माजी उपसरपंच तुकाराम देवदास मुंडे यांना नुकताच राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे.

शिक्षक दिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्य साधून एकता सेवा भावी संस्था महाराष्ट्रच्या वतीने स्वयंरोजगार मेळावा राज वैद्य सोशल फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्षा परभणी पालकमंत्री सौ मेघनाताई



बोर्डीकर, प्रमुख अतिथी मा. डॉ. इंद्र मणी कुलगुरू वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी ,कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. अरुणजी मराठी उद्योजक परभणी ,विशेष अतिथी मा . गितांजली कुलकर्णी अभिनेत्री , प्रमुख पाहुणे अबुबकर भाईजान, मा अ‍ॅड .पवन निकम, मा. डॉ. सय्यद खलील, मा. संतोष धारासुरकर ,मा. डॉ. सालेहा कौसर,मा.गफार मास्टर,या. दिनेश परसावत,मा .सुरेश अ.हिवराळे, कार्यक्रमाचे निमंत्रक संस्थापक अध्यक्ष एस एन राव ,राज वैद्य सोशल फाउंडेशन महाराष्ट्र, पुरस्कार निवड समिती अध्यक्ष बालासाहेब फड संपादक दैनिक सोमेश्वर साथी, कार्यक्रमाचे आयोजक अजमत खान यांच्या वतीने वार बुधवार दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता परभणी येथे आयोजित करण्यात आले आहे.

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कारांचे किरणकुमार गित्ते यांच्या हस्ते होणार वितरण

परळी वैजनाथ (बातमीदार):- मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त घोषित केलेल्या आदर्श शिक्षक, सेवागौरव,साहित्य गौरव व विशेष कार्य गौरव पुरस्कारचे वितरण बुधवार दि.१७ सप्टेंबर रोजी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या सभागृहात सांयकाळी ठीक ४ वाजता त्रिपुरा राज्याचे सार्वजनिक बांधकाम, आरोग्य,उद्योग,पर्यटन आदी खात्याचे सचिव किरणकुमार गित्ते साहेब यांच्या शुभहस्ते होणार आसल्याची माहिती साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांनी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून साहित्य परिषदेच्या वतीने परळी तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक, साहित्य आदी क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणार्या, योगदान देणार्या शिक्षकांचा व इतर मान्यवरांचा साहित्य परिषदेच्या वतीने गौरव/सन्मान केला जातो. यावर्षी परळीसह इतर तालुक्यातील ११ शिक्षकांची *आदर्श शिक्षक* पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेले शिक्षक व त्यांच्या शाळा पुढीलप्रमाणे- मा.श्री.श्याम साधू मुंडे (मुख्याध्यापक - वसंतराव नाईक विद्यालय, वरवटी ता.अंबाजोगाई), अनुपकुमार अरुण कुसूमकर (महाराष्ट्र विद्यालय, मोहा), अजय रमाकांतराव जोशी (मुख्याध्यापक - वैद्यनाथ विद्यालय परळी), मोहन अमृतराव कांदे (मुख्याध्यापक - सरस्वती विद्यालय आचार्य टाकळी), मुरलीधर वैजनाथ कराड (मुख्याध्यापक - बालाघाट विद्यालय,दौनापूर), प्रमोद भागवतराव गादेकर (जि.प.प्रा.शा.धामोनी ता.सोनपेठ), दिगंबर बापुराव परसेवाड (जि.प.प्रा.शाळा, मांडवा), रुपाली काशिनाथराव ढाळे (जि.प.प्रा.शाळा चांदापूर), श्रीमती रंजना नाथराव जाधव (जि.प.प्रा.शाळा,धावडी ता.अंबाजोगाई),मंजुषा माणिकराव शिंदे (जि.प.प्रा.शा.इंजेगाव), सुषमा सुरेशराव साळेगावकर (जि.प.प्रा.शाळा, सिरसाळा) यांची निवड करण्यात आली आहे. यंदाच्या *स्व.सुवालालजी वाकेकर सेवागौरव* पुरस्कारासाठी येथील सेवानिवृत्त नायब तहसिलदार मा.श्री बाबुराव रुपनर व प्रदीप तुळशीराम मुंडे (मुख्याध्यापक - रत्नेश्वर विद्यालय, टोकवाडी) यांची निवड करण्यात आली आहे.

यंदाच्या स्व.सुवालालजी वाकेकर स्मृति साहित्यसेवा गौरव* पुरस्कारासाठी अंबाजोगाई येथील ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब यांची निवड करण्यात आली आहे. तर 'विशेष कार्यगौरव' पुरस्कार प्रा.गणेश शेषेराव चव्हाण (वैद्यनाथ महाविद्यालय) यांना देण्यात येणार आहे. 'विशेष गौरव/सन्मान' याच बरोबर यावर्षी दैनिक लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार मिळालेले मा.श्री.लक्ष्मण मुंडे (मुख्याध्यापक-ज्ञानबोधिनी विद्यालय),दिपकराव तांदळे (सचिव-संस्कार प्रा. विद्यालय),डॉ.विशाल राठोड (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मंत्रालय, मुंबई),चेतन सौंदळे (सहशिक्षक/सामाजिक कार्यकर्ते) यांचाही मसापच्या वतीने विशेष सन्मान/गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयजी वाकेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आसून कार्यक्रमास जवाहर शिक्षण संस्थेचे सचिव दत्ताप्पा ईटके गुरुजी यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

तरी या गौरव/सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमास शिक्षक, प्राध्यापक व शिक्षण प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांच्यासह कार्याध्यक्ष अनंत मुंडे, उपाध्यक्ष अरुण पवार, कोषाध्यक्ष प्रा.संजय अघाव, सहसचिव दिवाकर जोशी, प्रा.अर्चना चव्हाण, संपर्क प्रमुख बालाजी कांबळे, प्रसिद्धी प्रमुख सिध्देश्वर इंगोले व त्यांच्या सहकार्यांनी केले आहे.

## नवीन प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराला मोठा प्रतिसाद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.१३) 'दप्तरविना शाळा' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला.

शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व सुदृढ आरोग्याबाबत विद्यार्थ्यांना तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या सभागृहात हा कार्यक्रम घेण्यात आला. येथील डॉ.ज्योती विशाल आघाव (नागरगोजे), सोनपेठ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ.नेहा ज्ञानेश्वर धोंडगे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, ज्ञानेश्वर धोंडगे, पर्यवेक्षक उमेश देशमुख सर, एल.आय.वाकडे, ज्येष्ठ शिक्षक राहूल ताटे, विनोद देशमुख, सौ.आर.पी.निटुरे,





सौ.मलशेटवार, प्राजक्ता काटकर, सौ.आर.आर.जाधव, सौ.साकसमुद्रे, भागवत मुंडे, विनोद वाघमारे, श्री श्रीरामे, श्री चौरे, श्री निरडे, सौ.देवकर, सौ.गंगणे, सौ.राऊत, सौ.मुंडे, नागेंद्र जाधव, श्री घोलप, श्री डिकले यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राजक्ता काटकर यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ.ज्योती नागरगोजे व डॉ.नेहा धोंडगे यांनी विद्यार्थ्यांचा आहार, विहार व दिनचर्या याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना समतोल, सकस आहार मिळावा यासाठी पालकांनी जागरूक राहिले पाहिजे, भावी पिढी सुदृढ व तंदुरूस्त व्हावी म्हणून आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत असे सांगून त्यांनी बदलत्या जीवनशैलीत बाजारात मिळणारे फास्टफुडचे पदार्थ विद्यार्थ्यांचे आरोग्य बिघडवतात, असे पदार्थ विद्यार्थ्यांना देऊ नयेत असेही त्यांनी सांगितले. मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांना पालकांकडून दिल्या जाणाऱ्या डब्ब्यात बेकरीच्या पदार्थांऐवजी पालेभाज्या, फळभाज्या, पोळी भाकरी असली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळ, व्यायाम, आहार या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे असेही डॉ.नागरगोजे, डॉ.धोंडगे म्हणाल्या. यावेळी बोलताना ज्येष्ठ शिक्षक एल.आय.वाकडे यांनी शाळेत आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांबाबत माहिती दिली. मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांनी दप्तरविना शाळा उपक्रमांतर्गत शाळेत सुरू असलेल्या नवनव्या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळतो आहे, आरोग्य शिबिरामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ होण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले. सुत्रसंचालन सौ.आर.आर.जाधव यांनी तर आभार प्रदर्शन विनोद देशमुख, उमेश देशमुख यांनी केले. **

* सुविचार *

**वेळ हा असा एक तराजू आहे जो वाईट काळात आपल्या माणसांचं वजन आपल्याला बिनचूकपणे दाखवितो.!**

संपादकीय...

# प्रकल्प तुडुंब..!

यंदाचा पावसाळा आजपर्यंतच्या पावसापेक्षा वेगळा आहे. यावर्षी भर उन्हाळ्यात म्हणजे मे महिन्यात पावसाला सुरूवात झाली. सप्टेंबर अर्धा झाला तरी पाऊस बरसतोच आहे. गेल्या साडेचार महिन्यापासून बरसणारा पाऊस सर्वत्र सारखा नाही. यंदा पावसाचे मोठे खंडही पडले. पडलेला पाऊस ढगफुटी सदृश्य तर कुठे मुसळधार झाला व सध्याही होतो आहे. मंडळात व मंडळाच्या परिसरात ढगफुटी होणे किंवा मुसळधार पाऊस होणे हा प्रकार गेल्या काही वर्षात सततचा सुरू आहे. यावर्षी मात्र अशा पावसाने कहरच केला आहे. पूर्वी असा पाऊस नसायचा पावसाळा सुरू झाला की पाऊस सर्वदूर सारखा बरसायचा. पावसाचे दिवसही अधिक असायचे. आता असे राहिले नाही. ठराविक भूभागातच जोराचा पाऊस बरसतो आहे. इतर ठिकाणी मात्र कुठे रिमझिम तर कुठे हलक्या सरी पडत आहेत. यंदा आपल्याकडे झडीचे पाऊस खूप कमी झाले. पूर्वी असे नव्हते. झडीचे चार-सहा पाऊस हमखास पावसाळ्यात व्हायचे. एकदा झडीचा पाऊस सुरू झाला की चार-चार दिवस उघडायचा नाही. या पावसाळ्यात दोन-तीन वेळाच झडीचे पाऊस झाले, परंतु पडलेला पावसात नेहमी सारखा जोर नव्हता. एकूणच पावसाचे ताळतंत्रच आपल्याकडे बदलत चालले आहे. पावसात होत असलेल्या बदलामुळे खरीप पिकांना मोठा फटका बसतो आहे. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते आहे. हे असेच सत्र सुरू राहिल्यास आपल्याकडे शेतीसाठी ही धोक्याची घंटा आहे.

यंदाच्या पावसाळ्यात बीड जिल्ह्यात दहा सप्टेंबर पर्यंत वार्षिक सरासरीच्या केवळ ४८८ मिलीमीटर म्हणजे ८६ टक्के पाऊस झाला आहे. झालेल्या पावसाचे प्रमाणही जिल्ह्यात सर्वत्र सारखे नाही. कुठे जास्त तर कुठे खूपच कमी असे आहे. गेल्या वर्षी दहा सप्टेंबर पर्यंत बीड जिल्ह्यात ६८७ मिलीमीटर म्हणजे १२१ टक्के पाऊस झाला होता. यंदा बीड तालुक्यात ५१७, पाटोदा ४४७, आष्टी २७४, गेवराई ४९८, माजलगाव ५६६, अंबाजोगाई ५८३, केज ५०५, परळी ५७३, धारूर ५९१, वडवणी ४१८ व शिरूर कासार ४७९ मिलीमीटर एवढा पाऊस दहा सप्टेंबर पर्यंत झाला आहे. बीड जिल्ह्याची वार्षिक सरासरी साडेसातशे ते आठशे मिलीमीटर आहे. आपल्या परळीचेही वार्षिक पर्जन्यमान एवढेच आहे. हा पाऊस एक जून पासूनचा आहे. परंतु आपल्याकडे मे महिन्यापासून पाऊस बरसत असल्याने तो पाऊस धरला तरी सरासरी ८० ते ९० टक्के पाऊस होतो.

यंदा वार्षिक सरासरीएवढा पाऊस जिल्ह्यात दहा सप्टेंबर पर्यंत कुठेच झाला नाही. मात्र ऑगस्ट अखेर पर्यंत जिल्ह्यातील छोटे, मोठे मिळून १०२ प्रकल्प तुडूंब म्हणजे १०० टक्के भरले आहेत. या प्रकल्पात सुमारे ६६७ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. हीच स्थिती मराठवाड्यातील आहे. मराठवाड्यात ऑगस्ट अखेर पर्यंत सर्व मोठे, मध्यम व लघू प्रकल्प तुडूंब भरून ओसंडून वाहत आहेत. बहुतेक नद्या, नाले, ओढे प्रवाहित झाले आहेत. ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये झालेल्या पावसाने हे चित्र बदलले आहे. अकरा-बारा सप्टेंबरपासून पुन्हा धो-धो पाऊस बरसतो आहे. यामुळे मोठ्या प्रकल्पातील पाणी नदी पात्रात सोडण्यात येत असल्याने नद्यांना पूर आले आहेत.

परळी तालुक्यात ५७३ मिलीमीटर पाऊस यंदा दहा सप्टेंबर पर्यंत झाला आहे. तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान ७५० ते ८०० मिलीमीटर आहे. वार्षिक सरासरी एवढा पाऊस झालेला नसूनही तालुक्यातील वाण, बोरणा, बोधेगाव हे मध्यम प्रकल्प व इतर सर्व छोटे-मोठे प्रकल्प तुडूंब भरून ओसंडून वाहत आहेत. यामुळे तालुक्यातील सर्व नद्या खळखळून वाहत आहेत. यामुळे तालुका 'पाणीदार' झाला आहे. या जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आता आपल्या हाती आहे. दरम्यान, तालुका 'पाणीदार' झाल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण आहे. यामुळे रब्बी हंगामाची चिंता मिटली आहे. **

# मराठवाडा मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्याचे योगदान...

**१७ सप्टेंबर... मराठवाडा मुक्ती संग्राम दिन.... यानिमित्त मराठवाडा मुक्ती स्वातंत्र्य संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले ज्येष्ठ शिक्षक डॉ. रमाकांत निर्मळ यांनी जागवलेल्या आठवणी...**

भारतास १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. परंतु, मराठवाड्याच्या नशिबी १ वर्षे, १ महिना व १ दिवस उशीरा म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वातंत्र्य प्राप्त झाले. या आंदोलनास हैद्राबाद मुक्ती संग्राम म्हणतात. पण, मराठवाडा मुक्तीदिन हे जास्त योग्य वाटते. स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात ताठ कण्याची माणसे होती, आज स्वाभिमानाचा एखादा मणका सांभाळणाऱ्याची ससेहोलपट होते. हसत - गात, फाशी जाणारे, गोळीबारात प्राण गमावलेले, कायमस्वरुपी जखमा (शरीर व मनावरील) सांभाळणारे, लाठ्या - काठ्यांचा मार खाणारे अनेक भारतपुत्र होते. मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करणारे होते.

मराठवाडा हा विभाग हैद्राबाद राज्यात होता. रामानंद तीर्थांच्या स्फूर्तीमधून हे आंदोलन उभे राहिले. प्रस्तुत लेख मराठवाड्याच्या संघर्षात चंपावती नगरी (बीड जिल्हा) चे योगदान या अनुषंगाने लिहित असल्याने इतर नामोल्लेख व विस्तार टाळले आहेत. सुदैवाने माझ्या जवळजवळ ऐंशी वर्षांच्या आयुष्यात या संग्रामातील अनेक थोर वीरांचे दर्शन मला याचि देही याचि डोळा घडले. बोलणे व चर्चाही करता आल्या. १७ सप्टेंबरच्या सोनेरी दिवसासाठी किती लोकांनी किती यातना, वेदना, अन्याय सहन केला असेल. तसेच अनेक अज्ञात लोकांच्या नाही चिरा नाही पणती स्वरुपातील त्यागाचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

बीडच्या क्रांतीकारकांत सर्वात अग्रणी काशीनाथराव जाधव यांचे नाव घ्यावे लागते. गायन, विनोदी भाषा, ग्रामीण बोली आणि कधी गव्हाणे, कधी शेतकरीदादा अशा टोपण नावे घेत त्यांनी कार्य केले. त्यांच्यासह रामलिंग स्वामी, पुरुषोत्तमराव चपळगावकर, मोतीलालजी मंत्री, मधुकरराव गोडसे, रामराव आवरगावकर, नरहरराव तुंगार, वामनराव वझे, ना. के. महाशय, रामराव सवई वगैरेंच्या भेटी झाल्या. बोलणे व चर्चा झाल्या. हे लोक समोर दिसताच मी रस्त्यावरही त्यांच्या पाया पडत असे. स्वातंत्र्यासाठी रक्त सांडणारे हे लोक कायम आदरणीयच राहिले. काही प्रसंगी त्यांच्याशी मतभेदाचे प्रसंग आले. पण त्यांचे आदराचे स्थान ध्रुवाप्रमाणे मनात अढळ होते व आहे.

कासिम रझवीच्या रझाकार संघटनेने उच्छादच मांडला होता. त्याचा विरोध करताना अनेक युक्त्या वापरल्या जात. बीडमधील एक धोंडोपंत नावाचे गृहस्थ जटाशंकरमध्ये गुप्त बैठका घेत. त्यांच्या आदरामुळे धोंडीपुरा (नंतर टिळक रोड) नाव रस्त्यास देण्यात आले. काशीनाथराव जाधव कुरुनदास मठ (रामतीर्थ) येथे गुप्त बैठका घेत व चोरबोळीतून धोंडी पुऱ्यात येत. पोलिसांना हे जमिनीतून उगवले की काय असा संभ्रम होई. चपळगावकर, स्वामी, वझे ही वकील मंडळी कोर्टातून सोडवीत. प्रसंगी खाऊ घालून गावी जाण्यासाठी पैसेही देत असत. आ. कृ. वाघमारे, अनंत भालेराव अन्यायाला वर्तमानपत्रातून वाचा फोडीत असत. केसरीचा अंक गुप्तपणे पिशवीत घालून अनेक घरी पोहोचत असे. अन्याय करणाऱ्यांना धडा शिकवण्याचे अनेक प्रकार होते. काळे कपडे घालून जाधव यांनी एका आम्ही अमिनाचे रात्रीत नाक फोडले होते.



पोलिसांच्या वेशात जाऊन हल्ले करत असत. एक किस्सा असा होता की एकाला उर्दू येत नव्हते. तो मुका आहे असे इतर सांगत. पण तो भयंकरच होता.

काही अनुभवांची चर्चाकरणे आवश्यक वाटते. बलभीमचे माजी प्राचार्य पांडुरंग सावंत प्रत्येक वर्षी १७ सप्टेंबरला स्वातंत्र्यसैनिकांना बोलावून अनुभव सांगण्याचा आग्रह करीत. चोरून पिशवीत बॉम्ब आणताना एक खाली पडला. पोलिसांनी मारहाण केली. पण कुठून आणले व कोणास देणार हे बोललो नाही, असे मधुकर गोडसेंनी सांगितले. एका मुलाने म्हाताऱ्या पित्यास धरून आणले व उभे केले. केजचे पांडुरंग जोशीं जे सांगितले त्यामुळे अनेकांचे डोळे ओले झाले होते. जोशी म्हणाले, रझाकारांनी माझ्या बायकोस माझ्याबद्दल विचारले. तिचा त्याग माझ्यापेक्षा जास्त आहे. तिच्यासमोर मुलाचे तुकडे केले पण ती गप्प होती. रडत होती. एकही शब्द बोलली नाही. श्रद्धा असलेले आडगावचे किसान कुलकर्णी खिसा कापला गेला. पण मित्र व नातेवाईकाकडून पैसे घेऊन पंढरपूरला गेले. त्यांची पत्नी (मृत्यू वय ९५ वर्ष) दरवर्षी चार महिने पंढरपूरला राहत असे.

स्वातंत्र्य संग्रामात, भारताच्या किंवा मराठवाड्याशी प्रत्यक्ष सहभाग नसणारे सहकार्य करीत, सहानुभुती असे. ना. के. महाशयांनी चंपावती शाळा सुरु केली. 'वंदे मातरम्' प्रार्थनेवेळी शाळेवर दगडफेक होई. येळंबघाटचे (यज्ञकर्ते) रंगनाथ महाराज सेलुकर अनेक वर्षांनी गावी आले, त्यांची मिरवणूक काढली पण मोठ्या झालेल्या त्यांच्या मुलास (यज्ञेश्वर महाराज) ते ओळखू शकले नाहीत. डॉ. भीमराव पिंगळेसोबत मी वडवणीजवळील डोंगरदरीत जावून आलो. येद्या व मुग्या नावाचे दोन अशिक्षित क्रांतीकारक रात्री कंदील हलवून दाखवीत. त्यांना अन्न दिले जाई. रझाकारांच्या ७ पिढ्यांना सापडणार नाही अशी थोर जागा त्यांनी निवडली होती. एक क्रांतीकारक दोन-तीन महिने एका विहिरीत कपारीत लपून बसला होता. त्याला अन्न व निरोप हे पोहऱ्यातून दिले जात. पाहणारास तो माणूस किंवा ती स्त्री पाणी शेंदीत आहे असे वाटे. पोलिसापेक्षा बुध्दीवान क्रांतीकारक असत.

भुजंगराव पहिलवानाचा दरारा व भीती एवढी होती की दोन तीन पोलीसही पात्रुड गल्लीत जाण्यास घाबरत असत. जाधवांनी बोर्डींग सुरु केली ते मुलांशी बोलत, किस्से सांगत, स्फूर्ती देत. तेथे खेड्यातून आलेले अनेक जन उच्च पदावर गेलेले आहेत. आजही आठवण झाली की ते हळवे होतात.

निजामशाहीच्या व रझाकारांच्या वरवंट्याखाली अनेक खेड्यातील अनेक लोक चिरडले गेले आहेत, अनेकांच्या नावाची कोठेही नोंद नाही. काशीनाथराव जाधवांच्या मुलाने (डॉ. राधाकृष्ण) मला त्यांचा 'बिंदुसराचे पाणी' हा चरित्रग्रंथ भेट दिला. अनेकवेळा वाचला. ग्रंथाशेवटी गोळीबारात प्राण गमावलेल्या २२ लोकांची नावे व दोघे अज्ञात अशी यादी आहे. यातील ८ लोकांचेच स्मारक आहे. उर्वरित स्वातंत्र्यसैनिकांचे स्मारक होणे हे त्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन राहील. क्रांतिवीर हा शब्दच प्रचंड स्फूर्ती देतो. मी शाळेत शिकताना बीडच्या बसस्टँडवर क्रांतीसिंह नाना पाटील (पत्रीसरकार) दिसले, धावत जाऊन पाया पडलो. ते बीडचे खासदारही झाले होते. नाना पाटील, जंगमस्वामी, काशीनाथराव जाधव यांची भाषणे प्रभावी व विनोदी असत. गोविंदभाई श्राफ, अनंतराव भालेराव, बाबासाहेब परांजपे, रामलिंग स्वामी यांची भाषणे गंभीर विचारी असत. या देशाचे थोरपण व समाजाचे दोष याबद्दल आत्मचिंतन करावे, एवढे सामर्थ्य त्यांच्या वाणी व विचारात असे. सध्याच्या फेसबुक, ई-मेल, मॅसेज फॉरवर्ड, लाईक्स यांच्या मायाजालात गुंतलेल्यांच्या नशिबी हा आनंद नाही. जाताजाता एक सांगतो मी इंग्रजीचा शिक्षक, सर्व पदव्या त्याच विषयात त्यामुळे काही शब्द वापरीत आहे. मराठवाड्यात स्वातंत्र्य लढ्यात अनेकजण अननोन, अनसीन, अनसंग, अनऑनर्ड आहेत. त्या अज्ञात लोकांच्या चरणी त्रिवार विनम्र अभिवादन.

**- डॉ. रमाकांत निर्मळ,** बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

* वर्ष ०९ * अंक १९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ * किंमत : २ रू.

# बालकुमारांच्या भावविश्वात रंग भरणारी सात भागांची कथा मालिका 'एक होता ढम्या..!'

**मराठी बालसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते मुलांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी एक प्रभावी माध्यम आहे. बालकुमारांच्या मनात उमलणाऱ्या विचारांना, त्यांच्या जिज्ञासेला आणि स्वप्नांना योग्य दिशा देणारे साहित्य हे त्यांच्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. अशाच एका हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी बालकथा मालिकेचा उल्लेख करायचा झाला, तर 'एक होता ढम्या' ही सात पुस्तकांच्या भागांची मालिका विशेषत्वाने पुढे येते. या मालिकेचे लेखक आहेत परळी वैजनाथ येथील लक्ष्मण ईश्वरराव वाकडे : एक समर्पित शिक्षक, पत्रकार, संपादक आणि सांस्कृतिक निवेदक.**

'एक होता ढम्या' ही सात पुस्तकांची कथा मालिका नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनाच्या निमित्ताने परळी येथील सुधांशू प्रकाशनद्वारे प्रकाशित झाली. याचे बालवाचकांनी स्वागत केले आहे. यापूर्वी श्री वाकडे यांच्या सारे मिळून गावूया!, सोबती, गब्रूबंड्या, दोस्त असे बालसाहित्य प्रसिद्ध आहेत. गब्रूबंड्या ही बालकुमारांसाठीची कथा पुस्तिका खूपच गाजली. श्री वाकडे या बालसाहित्यासह बालकुमारांसाठी विविध विषयावर लेखन केले आहे.

एक होता ढम्या या एकूण पंधरा भागांच्या कथा पुस्तिका आहेत. त्यापैकी सात कथा पुस्तिका प्रकाशित झाल्या आहेत. या कथा पुस्तिकेतील पहिला भाग 'ढम्या झाला मोठ्ठा!' या शीर्षकाची कथा आहे. बालवाचकांसमोर देताना ही कथा पुस्तिका बालवाडीत जाणाऱ्या शाळकरी मुलाचे भावविश्व उलगडणारी आहे. ही गोष्ट 'ढम्या' नावाच्या एका पाच वर्षाच्या चिमुकल्या मुलाची आहे. त्याला जाण्याची ओढ यातून प्रकर्षाने दिसले. शाळेत जाण्यासाठी त्याने धरलेला हट्ट व त्यासाठी त्याने केलेले प्रयत्न लेखकाने सुरेखपणे मांडले आहेत.
ढम्याच्या शाळेच्या पहिल्या दिवसाची तयारी, त्याचा भावनिक गोंधळ, कुटुंबातील संवाद, आणि शाळेतील अनुभव यांचे अत्यंत सूक्ष्म आणि भावपूर्ण चित्रण या कथेत केले गेले आहे.

ढम्याच्या मनात शाळेची उत्सुकता आहे, पण त्याचबरोबर अनोळखी वातावरणाची भीतीही आहे. त्याच्या आई, बाबा, ताई आणि बंडूमामा यांच्याशी असलेले नाते, त्यांचे प्रेम आणि मार्गदर्शन यामुळे ढम्याचा आत्मविश्वास वाढतो आणि तो शाळेच्या जीवनात तो रमतो. ही गोष्ट वाचताना वाचकाला स्वतःचे बालपण आठवते आणि ढम्याच्या भावनांशी आपोआप जोडले जाते.

'ढम्या' म्हणजे प्रत्येक घरातला एक गोंडस मुलगा. जिज्ञासू, हट्टी, भावनाशील आणि प्रेमळ. त्याच्या शाळेच्या पहिल्या दिवसाची तयारी, त्याचे दप्तर, पेन, पेन्सिल, वॉटरबॅग यामध्ये हरवलेला तो, आणि शाळेच्या गोंधळात गोंधळलेला चेहरा. हे सगळं वाचताना वाचकाच्या मनात एक चित्र उभं राहतं. ढम्याच्या आई, बाबा, ताई आणि बंडूमामा यांचं प्रेम, मार्गदर्शन आणि संवाद हे मुलांच्या भावनिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

बंडूमामासोबतच्या गोड गप्पा, आईकडून मिळणारी समजूत, ताईकडून मिळणारा अभ्यासाचा आधार हे सगळं वाचताना आपणही त्या घरातले एक सदस्य असल्यासारखं वाटतं. ढम्याच्या 'मला मोठं करा!' या निरागस मागणीमधून मुलांच्या मनातील उत्कंठा आणि स्वप्नांची झलक दिसते.




पुस्तकाच्या दुसऱ्या भागात 'चुकीची शिक्षा' ही कथा आहे. शाळेतील एका प्रसंगातून लेखक एक मोठा सामाजिक संदेश या कथेच्या माध्यमातून देतात. ढम्याची एक छोटीशी चूक, शिक्षकांची प्रतिक्रिया, आणि घरातील समजूतदार संवाद हे सारे मिळून एक शैक्षणिक दृष्टिकोन उभा करतात.

बालकांच्या चुका या त्यांच्या विचारप्रक्रियेचा भाग आहेत, त्या दडपण्याऐवजी समजून घेणं आवश्यक आहे. श्री वाकडे सर सांगतात की प्रत्येक चूक ही शिक्षा नव्हे, ती शिकवणीची संधी आहे. ही कथा पालकांना आणि शिक्षकांना अंतर्मुख करणारी आहे. कारण ती विचार करायला लावते की आपण मुलांच्या भावनांना किती समजून घेतो, आणि त्यांच्या प्रश्नांना किती उत्तरं देतो.

'नवी शाळा' या तिसऱ्या कथेत ढम्या व त्याचे कुटुंब एका नव्या शहरात जातात. नव्या शाळेत ढम्याचा व त्याच्या ताईचा प्रवेश होतो. वडिलांची बदली, नवीन घर, नवीन शाळा हे सारे अनुभव मुलांच्या भावविश्वाला हादरे देतात. कथेतील ढम्या 'भीजलेल्या उंदरासारखं' हा प्रसंग केवळ शब्द नाही, तर बालमनाची एक जिवंत प्रतिमा आहे. ढम्याची घाबरणं, गोंधळणं, ताईच्या सायकलबद्दल ईर्ष्या वाटणं हे सारे अनुभव वाचकाच्या मनात खोलवर रुजतात. या भागात आईची कोमलता, वडिलांची साथ, आणि ताईचा समजूतदारपणा. हे सारे मिळून एक कौटुंबिक आधार तयार करतात, जो बदलाशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

'शेपटीचे फॅक्चर' ही कथा पुस्तिका बालकाच्या निरीक्षण शक्तीचा आणि वैज्ञानिक जिज्ञासेचा एक सुंदर नमुना आहे. दिवाळीच्या वेळी हाताला दुखापत झालेल्या ढम्याच्या अनुभवातून लेखकाने बालमनाची विचारप्रक्रिया उलगडली आहे. हाताचं हाड व्यवस्थित जुळले, मग पिल्लाच्या शेपटीला का नाही? हा प्रश्न केवळ गमतीशीर नाही, तर बालमनाच्या वैज्ञानिक कुतूहलाचा आरसा आहे. या भागात आईचा सौम्यपणा, ताईचं कौतुक, आणि बाबांचं मौनातील मान्य करणं हे सारे मिळून घरातील प्रेमाची एक जिवंत झलक मिळते.

'बोचरा ढम्या' या कथा पुस्तिकेच्या पाचव्या भागात मुलांचे दात पडण्याच्या अनुभवातून लेखकाने बालकाच्या आत्मविश्वासाचा प्रवास दाखवला आहे. मित्रांची चेष्टा, आई–बाबांचा आधार, आणि ढम्याची सहज स्वीकारणारी वृत्ती. हे सारे मिळून एक सकारात्मक चित्र उभं केलं गेलं आहे.

'नापास ढम्या' ही कथा परीक्षेच्या निकालांपेक्षा भावनिक संघर्षांवर प्रकाश टाकते. ढम्याची देवावरची श्रद्धा, क्रिकेटचा छंद आणि अभ्यासावरील दुर्लक्ष हे सारे प्रसंग मुलांच्या वास्तवाशी जोडलेले आहेत. लेखक सांगतात की निकाल हे अंतिम सत्य नसतं; मुलांचा भावनिक प्रवास अधिक महत्त्वाचा असतो. पालक आणि शिक्षकांनी मुलांच्या भावनांना समजून घेणं आवश्यक आहे.

'चिमुताई' या सातव्या भागात ढम्याची कविता, कार्यशाळेतील पारितोषिक आणि शंकरपाळ्याच्या मोहात झालेली खोडकर गडबड. हे सारे मिळून एक आनंददायी, सृजनशील अनुभव तयार करतात. ही कथा सांगते की सृजनशीलतेला वयाचं बंधन नसतं, आणि खोडकरपणाही प्रेमाने सामावून घेतला पाहिजे.

'एक होता ढम्या' ही कथा पुस्तकांची मालिका केवळ वाचनीय साहित्य नाही तर ते विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि बौद्धिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा ठेवा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या संग्रहात ही पुस्तके असावीत कारण ती त्यांना जीवनाचे धडे देतात, भावनांची समज देतात, आणि त्यांच्या मनात संस्कारांची बीजे पेरतात. या पुस्तकांमधून मुलांना शिस्त, समजूतपणा, जिज्ञासा, आणि आत्मविश्वास आदींचे महत्त्व समजते. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी ही पुस्तके वाचावीत, जपावीत आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावीत असा हा ठेवा आहे.
'ढम्या'च्या गोष्टी वाचताना आपण केवळ एक कथा वाचत नाही आपण एका शिक्षकाच्या स्वप्नांना, एका लेखकाच्या संवेदनांना आणि एका संस्कृतिकर्मीच्या समर्पणाला अनुभवतो.

लक्ष्मण वाकडे सरांना सलाम ज्यांनी ढम्याच्या माध्यमातून बालकुमारांच्या मनात ज्ञान, संस्कार आणि आनंद यांची बीजे पेरली. ही मालिका आणि श्री वाकडे सरांचे साहित्य हे मराठी बालसाहित्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे इतके मौल्यवान आहे. हे साहित्य प्रत्येक विद्यार्थ्याच्या संग्रहात असावे, कारण ते केवळ वाचायला नाही, तर आयुष्य घडवायला आहेत.

**– अमोल रामराव कांबळे,**
न्यू हायस्कूल, थर्मल, परळी वै.

## लक्ष्मण वाकडे : हाडाचे शिक्षक, संवेदनशिल पत्रकार आणि लेखक

उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेत श्री लक्ष्मण वाकडे हे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मराठीचे शिक्षक म्हणून त्यांची ओळख. गेल्या ३८ वर्षाच्या शिक्षकी पेशात त्यांचा अनुभव आणि समर्पण हे त्यांच्या लेखनात स्पष्टपणे जाणवते. मुलांच्या मनाचा ठाव घेणारी भाषा, त्यांच्या भावनांना समजून घेणारी शैली आणि त्यांच्या जिज्ञासेला दिशा देणारे विचार हे त्यांच्या बालसाहित्यातून ठळकपणे दिसतात.

श्री वाकडे सरांची ओळख केवळ शिक्षक म्हणून मर्यादित नाही. ते उत्तम पत्रकार, संपादक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे निवेदक म्हणूनही कार्यरत राहिले आहेत. शिवाय शहरातील सामाजिक कार्यातही त्यांचा सहभाग असतोच. ते एखाद्या कार्यक्रमात निवेदन करतात तेंव्हा त्यांच्या आवाजात आत्मीयता दिसते. त्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमात जिवंतपणा असतो. त्यांच्या लेखनात संवेदनशीलता आहे. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वातूनच सोबती, दोस्त, गब्रूबंड्या, एक होता ढम्या या सारख्या बालकुमारांसाठीच्या कथा पुस्तिका जन्माला आल्या आहेत.



श्री वाकडे सरांची मुलांशी बोलण्याची, लेखनाची भाषा ही मुलांच्या गप्पागोष्टी प्रमाणे आहे. ती गोड, सोपी आणि भावपूर्ण आहे. श्री वाकडे हे केवळ लेखक नाहीत, ते एक प्रेरणादायी शिक्षक आहेत. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना केवळ अक्षर ओळख शिकवली नाही, तर जीवनाचे धडे दिले आहेत. त्यांच्या लेखनातून, त्यांनी मुलांना सांगितलेल्या कथातून शिकण्याची गोडी लागते, मुलांच्या भावनांना नवी दिशा मिळते.

श्री वाकडे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून परळी शहर, तालुका व पंचक्रोशीतील विविध सामाजिक प्रश्न हाताळले आहेत. वंचित, उपेक्षितांना आपल्या लेखणीतून न्याय दिला आहे. त्यामुळे पत्रकारितेत काम करताना त्यांनी आदर्श उभा केला आहे. साप्ताहिक परळी परिसर या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहताना त्यांचा पत्रकार आणि संपादक आदर्श घेण्याजोगा आहे. शाळेत असो वा सार्वजनिक ठिकाणी एखाद्या कार्यक्रमाच्या किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात निवेदनाच्या माध्यमातून त्यांची निवेदनाची शैली उपस्थितांशी साधलेला संवाद सर्वांनाच भावतो. त्यांच्या आवाजात आणि लेखनात एक सामाजिक जाणीव आणि आपलेपणाची ओढ प्रकर्षाने दिसते.

बालसाहित्याच्या क्षेत्रात यशस्वी ठरलेले श्री वाकडे सरांनी इतरही विविध विषयावर लेखण केले आहे. त्यांची सुमारे पंचवीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'वैद्यनाथाची परळी' हे पुस्तक वाचकांच्या विशेष पसंतीस उतरले आहे. या पुस्तकाच्या सहा आवृत्त्या निघालेल्या आहेत. परळी वैजनाथ या ऐतिहासिक आणि धार्मिक नगरीच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक पैलूंवर प्रकाश टाकणारे हे पुस्तक म्हणजे एक माहितीपूर्ण प्रवास आहे. या पुस्तकाने स्थानिक इतिहास आणि परंपरेला नवसंजीवनी दिली असून तेही वाचकांच्या संग्रहात असावे असेच आहे. याशिवाय श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग या विषयावर त्यांनी लिहिलेली विविध पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत. ***